रविवार दि.६ ऑक्टोबर २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०२ अंक : ३३
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

दैनिक बीड लोकनेता
जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | epaper.lokneta.in

# दुर्गा या असुरांचा नक्की संहार करतील:त्यांच्या आरोपांना कामाने उत्तर देऊ,मुख्यमंत्र्यांनी साधला विरोधकांवर निशाणा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**ठाणे (वृत्तसंस्था)**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शनिवारी ठाणे शहरातील अंतर्गत मेट्रो प्रकल्प, छेडा नगर ते ठाणे पूर्वमुक्त मार्ग प्रकल्पाचे भूमीपूजन व उद्घाटन करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार देखील उपस्थित होते. यावेळी एकनाथ शिंदे यांनी महाविकास आघाडीवर जोरदार टीका केली आहे.एकनाथ शिंदे म्हणाले, डोंगराएवढी कामे उभी राहत असताना विरोधक रोज आरोप, शिव्याशाप देण्याशिवाय यांच्याकडे दुसरे काही नाही. आम्ही नेहमी सांगतो, तुमच्या आरोपांना आम्ही आरोपाने नाही कामातून उत्तर देऊ आणि माझ्या समोर बसलेल्या या साक्षात दुर्गा या असुरांचा नक्की संहार करतील, यात माझ्या मनात शंका नाही, अशी टीका त्यांनी केली.

महाविकास आघाडीवर टीका करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, महाआघाडी सरकारच्या बालहट्टामुळे मुंबई मेट्रो ३ चे काम बंद पाडले होते. त्याची चौकशी लावा म्हणाले, पण मी काही चौकशी लावली नाही, नाहीतर हा कार्यकर्मच झाला नसता. त्यांचा आग्रह होता ही विकासकामे बंद करणे, अटल सेतु, समृद्धी, कोस्टल रोड, मेट्रो, कारशेड या संगळ्यामध्ये त्यांनी स्थगिती लावली. परंतु दोन वर्षांपूर्वी आम्ही यांचा टांगा पलटी केला आणि त्यामुळेच हे प्रकल्प पुढे जात आहेत. दरम्यान, वाशिम येथील पोहरादेवी येथे देखील पंतप्रधान मोदींचा दौरा पार पडला यावेळी 'बंजारा विरासत' या म्युझियमचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी देखील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांवर निशाणा साधला. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुपरहिट ठरली आहे, मात्र विरोधक म्हणतात ही योजना बंद करू, परंतु कोणीही लाडकी बहीण योजना कधीच बंद करू शकणार नाही. कारण ही योजना गोरगरीब बहीणींसाठी आहे, असे ते म्हणाले.



# खानवटे येथील गटरचारीचे काम निकृष्ट

## पाणी पुरवठा अधिकारी यांनी दिले चुकीच्या कामाचे मुल्यांकन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

खानवटे ता. दौंड येथे १५ वा वित्त आयोगातून तिन ठिकाणी भूविगत गटारचाऱ्यांचे काम झालेले असून, सदर कामाची जिल्हाधीकारी यांची परवानगी न घेता शासकीय गायरान गट नंबर २८८ मध्ये सदरची गटरकामे केली असून संबंधित निकृष्ट दर्जाच्या कामाचे मूल्यांकन देणाऱ्या उपअभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग पंचायत समिती दौंड यांना निलंबित करणे करण्यात यावे अशी मागणी माजी सरपंच बबनराव धायतोंडे यांनी केली आहे.

खानवटे येथे तीन वेगवेगळ्या ठिकाणी गटर चाऱ्यांची कामे झाली असून संबंधित कामे ही गायरान गट नंबर २८८ मध्ये करण्यात आली असून त्याबाबत माननीय जिल्हाधिकारी पुणे यांची कुठलीही परवानगी न घेता व ग्रामपंचायत खानवटे यांची मालकीची जागा नसताना तसेच गटरलाईनची संपूर्ण सिमेंटची पाईप जमीनी वरती असून, इस्टिमेट प्रमाणे खोल गाढलेले नाही. त्यामुळे ती फुटण्याची दाट शक्यता आहे,आणि संबंधित पाईपलाईन ही रस्त्याच्या मधोमध गाढल्याने ती भविष्यात रस्ता झाल्यास त्याची देखभाल दुरुस्ती करता येणार नाही.तसेच, गटरचाऱ्यांच्या चेंबरची संख्या कमी व अंतर जास्त आहे,चेंबर लांब अंतरावर बांधण्यात आलेली आहेत, व ती पण छोटीशी आहेत.त्यामुळे पाईपलाईन ब्लॉक होणार आहे.



तसेच सदरचे काम हे अतिशय निकृष्ट दर्जाचे झालेले असून सदरचे पाईपलाईन जमीनीच्या वरती असून त्यामधून गटरचे पाणी व पावसाचे पाणी जाऊ शकत नाही.तसेच सदरचे काम हे ग्रामपंचायत मालकीच्या जागेत न करता शासकीय गायरान गट नंबर २८८ मध्ये करण्यात आले आहे. जसे की सदरची जागा ही जिल्हाधिकारी पुणे यांच्या मालकीची असून संबंधित जिल्हाधिकारी यांची परवानगी घेणे आवश्यक होते परंतु कसलीही परवानगी न घेता गायरान गट नंबर मध्ये संबंधित काम करण्यात आले आहे. सदरचे निकृष्ट दर्जाचे काम असून पाईप जमीनी वरती असून संपूर्ण पाईप फुटण्याची दाट शक्यता असताना देखील संबंधित कामाचे (मूल्यांकन) एम.बी पंचायत समितीचे शाखा अधिकारी व उपअभियंता ग्रामीण पाणीपुरवठा विभाग पंचायत समिती दौंड यांनी आर्थिक देवाणघेवाण करुन (मूल्यांकन) मोजमाप केलेले आहे.त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करण्यात यावे. हे काम ठेकेदाराने न करता ग्रामपंचायतीच्या चार सदस्यांनी केलेले आहे.त्यामुळे या कामात मोठा भ्रष्टाचार झालेला आहे,त्यामुळे संबंधित कामाची तात्काळ चौकशी करून चुकीचे मुल्यांकन देणारे अधिकारी आणि ठेकेदार यांच्यवरती कारवाई करण्यात यावी अशी मागणी माजी सरपंच बबनराव धायतोंडे यांनी केली आहे.

# माय मराठीसाठी सोन्याचा दिवस-मुख्यमंत्री शिंदे

## आजचा दिवस मराठी भाषा गौरव दिन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

आजचा दिवस मराठी भाषा आणि मराठीवर प्रेम करणाऱ्यांसाठी सुवर्ण अक्षरांनी लिहून ठेवावा असा ऐतिहासिक आहे. जगभरात, सातासमुद्रापार पोहचूनही तिथे मराठी भाषा, सणवार उत्सव जोपासणाऱ्यांसाठी गौरवाचा, अभिमानास्पद दिवस आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त केला आहे. यासाठी त्यांनी राज्यातील जनतेचे अभिनंदन केले आहे. केंद्रीय मंत्रीमंडळाच्या या निर्णयाचे स्वागत करतानाच, मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी राज्यातील मराठी प्रेमी, तसेच साहित्यिक, संशोधकांनी केलेल्या प्रयत्नांचेही कौतुक केले आहे.

आजचा हा दिवस यापुढे 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा केला जाईल, असेही मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले.

मुख्यमंत्र्यांनी संत ज्ञानेश्वरांच्या माझा मराठाचि बोलु कौतुके। परि अमृतातें ही पैजा जिंके ॥ या ओळींचाही दाखला दिला आहे. ते म्हणतात, अखेर माय मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने एका लढ्याला यश आले. यासाठी महाराष्ट्र सरकारने केंद्राकडे सतत पाठपुरवठा केला होता. हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी मराठीला हा दर्जा मिळावा यासाठी आग्रह धरला होता. त्यांच्यासाठी हा निर्णय म्हणजे स्वप्नपूर्ती आहे . निती आयोगाच्या बैठकीतही मराठीला अभिजात दर्जा द्यावी अशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे मागणी केली होती. या निर्णयामुळे आपल्या प्रदीर्घ लढ्याला यश मिळाले आहे. मराठी माणसांच्या जिव्हाळ्याचा हा निर्णय आदिशक्तीच्या नवरात्रोत्सवाच्या पहिल्याच दिवशी घेतला गेल्याने दुधात साखर असा योग जुळून आला आहे. यासाठी आपल्या लाडक्या मराठीचा यथोचित सन्मान केल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तसेच केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांचे आभार मानतो. मराठी भाषा प्रगल्भ आहेच.

# साई भगवान पेट्रोलियमच्या भव्य शुभारंभास उपस्थितीत रहा-दहिफळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाथर्डी तालुक्यातील मिडसांगवी येथे सोमवार दिनांक ०७/१०/२०२४ रोजी सकाळी ठिक ११:०० वाजता साई भगवान पेट्रोलियमचा भव्य दिव्य शुभारंभ आयोजित केला आहे. तरी पाथर्डी व शिरूर (कासार) तालूक्यातील जनतेने मोठ्या संख्येने उपस्थितीत राहावे असे आवाहन माळेगावचे लोकनियुक्त सरपंच गोकुळ भाऊ दहिफळे यांनी केले आहे. तसेच श्री क्षेत्र भगवानगडाचे महंत न्यायाचार्य नामदेव महाराज शास्त्री यांच्या शुभ हस्ते संपन्न होणार आहे. या प्रसंगी ह.भ.प.महंत स्वामी जनार्दन महाराज गुरू निगमानंदजी महाराज, महंत ह.भ.प. विवेकानंद महाराज शास्त्री, महंत ह.भ.प.हनुमान महाराज शास्त्री, महंत ह.भ.प.शंकर महाराज, महंत ह.भ.प. सुरेशानंद महाराज हे संत महंत शुभ आशिर्वाद देण्यासाठी उपस्थितीत राहणार आहेत. तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी महसूल राज्यमंत्री सुरेश(आण्णा)धस, आमदार मोनिकाताई राजळे, प्रताप काका ढाकणे यांची उपस्थिती लाभणार आहे. तरी पाथर्डी व शिरुर (कासार) तालुक्यातील जनतेने साई भगवान पेट्रोलियमच्या भव्य दिव्य शुभारंभास पाथर्डी पाडळसिंगी रोड मिडसांगवी येथे उपस्थितीत राहावे असे आवाहन माळेगावचे लोकनियुक्त सरपंच गोकुळ भाऊ दहिफळे व दहिफळे परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.



# दिव्यांग बांधवांच्या समस्या सोडवण्यासाठी प्राधान्य देणार-आमदार शहाजीबापू पाटील

## सांगोला तहसील कार्यालयात दिव्यांग बांधवांची बैठक संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सांगोला । प्रतिनिधी**

बुधवार दि .२ ऑक्टोबर रोजी प्रहार दिव्यांग क्रांती आंदोलन संघटनेने विविध मागण्यांसाठी धरणे आंदोलन केले होते. सदर आंदोलनाची दखल घेऊन आमदार शहाजीबापू पाटील यांनी दिव्यांग बांधवांच्या समस्या सोडवण्यासाठी काल गुरुवार दि३ ऑक्टोबर रोजी तहसील कार्यालय सांगोला येथे तहसील कार्यालय , सांगोला नगरपरिषद , पंचायत समिती आणि पोलीस स्टेशन यांचे प्रमुख अधिकारी व दिव्यांग बांधव यांची संयुक्त बैठक आयोजित केली होती.

यावेळी उपस्थित सर्व कार्यालय प्रमुखांना दिव्यांग बांधवांच्या समस्या सोडवण्यासाठी प्राध्यान्य द्यावे अशा सूचना आमदार शहाजीबापू पाटील यांनी दिल्या.तसेच दिव्यांग भवनाचा प्रश्नही मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. त्यासाठी लागणारा निधी अजिबात कमी पडू देणार नाही अशी ग्वाही आमदार शहाजीबापू पाटील यांनी दिली.

सर्वप्रथम प्रहार दिव्यांग क्रांतीचे ता.अध्यक्ष सतीश दिडवाघ यांनी दिव्यांग बांधवांना स्वतंत्र शिधापत्रिका, ग्रामपंचायतींनी ५ % निधी खर्च करावा आणि इतर समस्या सांगितल्या. त्यावर आमदार शहाजीबापू पाटील यांनी संबंधित अधिकारी यांना दिव्यांग बांधवांच्या कोणत्याही प्रकारच्या अडचणी असल्यास त्या प्राधान्याने सोडवाव्यात अशा सूचना दिल्या

सदर बैठकीस तहसीलदार संतोष कणसे, निवासी नायब तहसीलदार सोमनाथ साळुंखे, मुख्याधिकारी सुधीर गवळी, गटविकास अधिकारी श्री. कुलकर्णी, पंचायत समिती अधिकारी श्री. फुले, प ,उद्योगपती आनंद घोंगडे बहुजन नेते बापूसाहेब ठोकळे ,संतोष खडतरे या प्रमुखांसह दिव्यांग बांधव तहसील कार्यालयात आयोजित केलेल्या बैठकीसाठी उपस्थित होते . उपस्थितीत दिव्यांग बांधवांचे प्रश्न तातडीने सोडवण्यात येणार असल्याने दिव्यांग बांधवाकडून शहाजीबापू पाटील यांचे आभार व्यक्त करण्यात आले.



**झाडे लावा झाडे जगवा**

## चारोळी

**इर्षा तुलना कशास करावी?**
**स्वतःच्या प्रगतीची आस धरावी**
**बदलाच्या चक्राची पाती फिरावी**
**नविन्याच्या शोधात झोळी भरावी**

रंजना सानप
मायणी (सातारा)

# धर्माबाद येथील शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्थाला हुतात्मा गोविंदराव पानसरे हे नांव द्या- शंकरराव जाधव रोशनगावकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**धर्माबाद । साहेबराव दुगाने**

हैद्राबाद मुक्ति संग्रामातील थोर हुतात्मे गोविंदराव पानसरे यांचा २१ ऑक्टोंबर, १९४६ रोजी रझाकारांनी अर्जापूर, ता.बिलोली, जि.नांदेड च्या सिंधीच्या बनात निघृन्न खुन केला.गांधीवादी गोविंदराव पानसरेंच्या हौतात्म्याने हैद्राबाद मुक्ति सुग्रामात होमकुंड पेटले. अहिंसक मार्गाने लढणा-या तरुणांनी शस्त्र हातात घेऊन जुलमी अत्याचारी रझाकारांना सळो-की-पळो करुन सोडले. अखेर १७ सप्टेंबर १९४८ रोजी जुलमी-अत्याचारी-अन्यायी निजाम, भारतीय सैन्यापुढे गुडघे टेकुन शरण आला व हैद्राबाद संस्थान मुक्त झाले.गांधीवादी पानसरे व मुक्ती संग्रामातील हजारो हुतात्म्यांच्या स्मरणात धर्माबाद येथील शासकिय औद्योगिक संस्थेस (आयटीआय) हुतात्मा गोविंदराव पानसरे हे नांव देण्यात यावे.राज्यातील २६ शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना समाज सुधारक व्यक्तिंचे नावे देण्याचा निर्णय नुकताच मंत्रीमंडळानी घेतला आहे.१७ सप्टेंबर, २०२४ रोजी हैद्राबाद मुक्तीसंग्राम अमृत महोत्सव वर्षाचे समापन करण्यात आले. त्या अमृत महोत्सवाची आठवण म्हणुन गांधीवादी थोर हुतात्मा पानसरेंचे धर्माबाद, जि.नांदेड येथल शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नामकरण करुन मराठवाड्यातील हैद्राबाद मुक्ति लढ्यातील सर्व हुतात्म्यांचा सन्मान वाढवावा अशी मागणी हु.पानसरे भक्त शंकरराव जाधव रोशनगावकर यांनी मागणी केली आहे.

# उमरी शहरात रामकथा व किर्तन सोहळा होत असलेल्या जागेचे भुमीपूजन अरविंद महाराज व कवळे गुरुजी यांच्या हस्ते संपन्न



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

सद्गुरु सदानंद बाबा महाराज यांच्या वार्षिक संजीवन समाधी शताब्दी वर्ष सोहळ्यानिमित्त होणाऱ्या भव्य दिव्य राम कथा व भव्य कीर्तन सोहळ्याच्या सभा मंडपाचे भूमिपूजन करताना संस्थानाचे मठाधिपती अरविंद महाराज, लोककल्याणकारी शेतकरी नेते मारोतराव कवळे गुरुजी यांच्या शूभहस्ते संपन्न झाले यावेळी उपस्थित माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी , सुभाष पेरेवार,एजाज खान,अशोक मामीडवार, गोविंदआप्पा नलबलवार, मारोती मुकावार, नरेंद्र येरावार भगवान असावा, शिवाजी हेमके,अनिल नगनूरवार,सह आदी सर्व भाविक भक्त उपस्थित होते

# लोणीचे ईदगाह मैदान सुशोभिकरण होणार-सागर आप्पा धस यांना युवा नेते वसीम शेख यांचे निवेदन

## सकल मुस्लीम धर्मियांच्या वतीने सागर आप्पा धस यांना साकडे- श्री वसीम शेख अध्यक्ष ईदगाह मैदान कृती समिती लोणी सय्यदमीर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

मुस्लिम समाजाच्या एकतेचे प्रतीक असलेल्या सामाजिक सलोख्याच्या आधारावर उभ्या असलेल्या अनोख्या ईदगाह मैदानावर सुंदर असे वॉल कंपाऊंड व सुशोभीकरण होणार आहे. मुस्लिम समाजाशिवाय युवा नेते सागर अप्पा धस यांनी आश्वासनाचा हात देत.या सुंदर इमारतीला समतेचा रंग दिला असून,आपले देखणे रूप घेऊन ही इमारत आता ईदच्या सणासाठी सज्ज होणार आहे आहे.चंद्रदर्शनानंतर रमजान ईदची नमाज येथील ईदगाह मैदानावर अदा केली जाणार आहे.ईदगाह मैदानाचे बांधकाम आता पूर्णत्वाकडे वाटचाल करणार आहे.लोनी सय्यदमिर या ठिकाणी हे ईदगाह मैदान आहे.एकूण सव्वा कोटीचा हा प्रकल्प आहे.याठिकाणी सुशोभीकरणासाठी खर्च अपेक्षित असून सकल मुस्लिम समाजाच्या वतीने सागर आप्पा धस यांना या ठिकाणी नम्र निवेदन देण्यात त्यावर





सागर आप्पा यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून त्या संदर्भात माहिती मागितली आहे.आता ईदगाहच्या बांधकामासाठी सर्वधर्मीय मदत जर दिली तर निश्चितपणे हिंदू-मुस्लीम एकत्र आल्याशिवाय राहणार नाहीत व संपूर्ण बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील लोणी सय्यद मीर येथील एकतेचे प्रतिक निर्माण होईल.भविष्यात ईदगाह मैदान सर्व धर्मीयांचे प्रतीक ठरणार आहे.अशी माहिती ईदगाह मैदान संरक्षण समितीचे अध्यक्ष वसीम शेख यांनी दिली येथील गेल्या अनेक वर्षांपासून ईदगाह मैदान ओस पडले असून बांधकाम करण्याची आवश्यकत्ता आहे. त्यादृष्टीने इदगाह मैदान समितीचे अध्यक्ष वसीम शेख तळागाळापासून प्रयत्न करत आहेत.अरेबिक पध्दतीच्या कमानी यासाठी उभारण्यात आल्या आहेत.मुस्लिमांच्या आवाहनाला इतर धर्मीयांनीही साथ देऊन याच्या बांधकामासाठी सढळ हाताने मदत केली तर एक प्रेक्षणीय स्थळ म्हणून याची ओळख निर्माण होईल.यामुळे याचे बांधकाम गतीने होण्यास मदत होणार आहे.या मैदानामध्ये एकाचवेळी १००० हजार मुस्लिम बांधव ईदची नमाज अदा करूशकणार आहेत.चारही बाजूने हे मैदान कुंपणाने बंदिस्त करण्यात येणार असून आहे. आतापर्यंत सर्वच काम अपूर्ण आहे.सध्या या ठिकाणी सकल मुस्लिम समाज स्वच्छ अशी साफसफाई करत असतो.परंतु आता युवा नेते सागर आप्पा धस यांच्या निदर्शनास ही बाब आणून देऊन.सागर आप्पा यांना मुस्लिम समाजातर्फे सागर आप्पा धस यांना नम्र निवेदन देण्यात आले आहे.सुशोभीकरणासंदर्भात सागर धस यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून लवकरच त्या दृष्टीने पावले पडण्याचे दाट शक्यता वर्तवण्यात येत आहे.त्यामुळे लोणी येथील मुस्लिम धर्मीयांना सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून निश्चितपणे ईदगाह मैदान प्रेक्षणीय स्थळ म्हणून नावारूपास येईल याबाबत तिळमात्र शंका नाही.अशी माहिती सकल मुस्लिम समाजाच्या वतीने करण्यात आली आहे.

---

आजी,माजी, आणि भावी आमदारांना नम्र विनंती आमच्या गोरगरिब बापांच्या मुलांना अध्यक्ष उपाध्यक्ष करून त्यांचं आयुष्य मातीत घालू नका....

हल्ली ते पण मूर्ख झालेत बापाचं एक ऐकणं झाले आणि नेत्यांना आपला बाप म्हणताय,

पण आदरणीय मित्रानो, लक्षात घ्या नेत्यांचे पोर विदेशात शिकतात आणि आमदार, खासदार इ. निवडणुका लढायला मतदारसंघात येतात. आणि ते निवडून आले की मग आपण १०-१२ हजारांसाठी पुणे - मुंबईच्या एमआयडीसीत. बघा वेळ अजून गेली नाही, नाही तर बेट्या मेला सत्रंजा उचलू उचलू..

मित्रांनो आपल्या आई वडिलांचं संपूर्ण आयुष्य गेलं. पण या नेत्यांनी कधी आनंदची दिवाळी साजरी होईल अस काम केलं नाही. आणि तुम्ही भाऊ कडून अपेक्षा ठेवतात की तुमचे दिवस बदलेल अरे सोडा ते विदेशात शिकले त्यांचे मुल पण विदेशात असतील, आपण निदान जिल्हा परिषदेच्या शाळेत मूळ पाठवतांना त्यांना पुरेशा सोय सुविधा देता येईल या कडे लक्ष द्या.

बघा जमलं तर ... नाही तर आहेच सत्रांजा आणि भोंगे



ज्ञानेश्वर बुधवत ,
मुख्यसंपादक दैनिक
लोकनेता,मातृतीर्थ
सिंदखेड राजा

---

# मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा:एक ऐतिहासिक यश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पुणे । प्रतिनिधी**

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे ही एक ऐतिहासिक आणि अभिमानाची घटना आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या मागणीसाठी विविध मराठी साहित्यिक, विचारवंत, आणि भाषातज्ज्ञ सतत प्रयत्नशील होते. अखेर, मराठीच्या समृद्ध भाषिक वारशाला मान्यता मिळाली आहे, ज्यामुळे या भाषेच्या अभिवृद्धीला आणि जतनाला मोठे पाठबळ मिळणार आहे.

भारतात अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्यासाठी काही महत्त्वपूर्ण निकष असतात. एखादी भाषा किमान १५०० ते २००० वर्षे प्राचीन असावी, तिचा साहित्यिक इतिहास समृद्ध असावा, आणि त्या भाषेचा प्रवास अखंड असावा. मराठी भाषेने हे सर्व निकष पूर्ण केले आहेत. मराठी भाषेचा इतिहास तेरा शतकांहून अधिक जुना आहे. संत साहित्य, वारकरी परंपरा, शिवकालीन काव्य, आणि प्राचीन प्राकृत भाषेपासून मराठीचा उद्भव हे सर्व घटक मराठीच्या समृद्धतेची साक्ष देतात.

अभिजात भाषेला मिळणाऱ्या काही प्रमुख फायद्यांमध्ये भाषेच्या संवर्धनासाठी आर्थिक मदत मिळते. केंद्र सरकारकडून दरवर्षी २५०-३०० कोटी रुपयांचे अनुदान दिले जाते. या अनुदानाचा वापर भाषेच्या अध्ययन-अध्यापनाला चालना देण्यासाठी, तसेच, प्राचीन साहित्य आणि ग्रंथांचा अनुवाद करून त्याचा प्रसार करण्यासाठी केला जातो. याशिवाय, मराठी भाषेतील साहित्यिक आणि संशोधकांसाठी राष्ट्रीय पुरस्कार दिले जातील, जे भाषेच्या प्रसाराला आणि मान्यतेला अधिक बळ देतील.

मराठी भाषेची परंपरा समृद्ध आणि वैविध्यपूर्ण आहे. संत तुकाराम, ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, आणि समर्थ रामदास यांच्या काव्याने मराठी भाषेला आध्यात्मिक आणि सांस्कृतिक उंची दिली. मराठ्यांच्या स्वराज्य स्थापनेपासून ते आधुनिक काळातील विविध साहित्यिक प्रवाहांपर्यंत, मराठीने एक लांबचा प्रवास केला आहे. शिवाजी महाराजांच्या काळात मराठी प्रशासन भाषा म्हणून वापरली जाऊ लागली, ज्यामुळे ती जनसामान्यांची भाषा बनली. संत साहित्यातील अभंग, ओवी, आणि काव्यरचना केवळ धार्मिक किंवा आध्यात्मिक अनुभवांनी मर्यादित नाहीत, तर त्या समाजातील अनेक सामाजिक आणि नैतिक मुद्द्यांना स्पर्श करतात. आधुनिक काळातही मराठी भाषेतील साहित्यिकांनी समाजपरिवर्तनाच्या विचारांना शब्दबद्ध केले. महात्मा फुले, बाबासाहेब आंबेडकर, आणि इतर क्रांतिकारक विचारवंतांनी मराठीला समाजाच्या विविध प्रश्नांशी जोडले.

अभिजात दर्जा मिळाल्यामुळे मराठी भाषेचा अभ्यास अधिक सखोलपणे केला जाईल. देशभरातील विविध विद्यापीठांमध्ये मराठीच्या अध्ययनासाठी विशेष केंद्रे उभारली जातील. प्राचीन ग्रंथांचा अनुवाद करून ते आधुनिक वाचकांपर्यंत पोहोचवले जातील. यामुळे मराठी भाषेचा जागतिक स्तरावर प्रसार होईल आणि ती भाषिक परंपरा आणखी विस्तारित होईल.

शालेय आणि महाविद्यालयीन पातळीवर मराठी शिक्षणाला आता अधिक महत्त्व दिले जाईल. सरकारकडून मिळणाऱ्या निधीतून मराठी साहित्य, व्याकरण, आणि भाषाशास्त्राच्या अभ्यासाला चालना दिली जाईल. यामुळे मराठी भाषेतील संशोधनाला नवीन दिशा मिळेल आणि नव्या पिढ्यांना मराठी भाषेची मौलिकता समजून घेण्याची संधी मिळेल.

मराठी भाषेत प्राचीन काळापासून ते आजच्या काळापर्यंत मोठे संशोधन कार्य झाले आहे. तुकारामाच्या अभंगांपासून ते विंदा करंदीकरांच्या कवितांपर्यंत, मराठी साहित्यिकांनी आपल्या कलेतून सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्यांना साकार केले आहे. याशिवाय, शिवकालीन कागदपत्रे, बखरी, आणि शिलालेख यांचा अभ्यास करून मराठीच्या ऐतिहासिक महत्त्वाची ओळख झाली आहे.

अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर मराठीला शासकीय पातळीवर मोठा पाठिंबा मिळेल. मराठी भाषेच्या जतनासाठी सरकारकडून विविध योजना राबविल्या जातील. मराठी साहित्यिकांना आणि संशोधकांना विशेष शिष्यवृत्त्या आणि पुरस्कार दिले जातील, ज्यामुळे त्यांचा हुरूप वाढेल. मराठी भाषेच्या जतनासाठी आणि संवर्धनासाठी अधिक संशोधन कार्य होईल.उपसंहारात, मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यामुळे आता मराठी भाषेच्या प्रसाराला अधिक बळ मिळेल. मराठी भाषेचे सांस्कृतिक, सामाजिक, आणि साहित्यिक महत्त्व अधिक वाढेल. या निर्णयामुळे मराठी भाषिकांना आपल्या भाषेचा सन्मान वाटेल आणि मराठीचे जतन करण्यासाठी नवीन योजना आणल्या जातील. हे यश एक ऐतिहासिक मीलाचा आहे, जो पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायक ठरेल.

**डॉ. सुवर्णा कराड प्रदेशाध्यक्षा**
**वंजारी महासंघ महिला आघाडी महाराष्ट्र**

---

## यालाच खरी मैत्री म्हणावे, हा कौटुंबिक सत्कार म्हणजे

# माझ्या आयुष्यातील मोठा सन्मान होय-ज्येष्ठ विधिज्ञ व्ही.एन.इंगळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बुलढाणा । ज्ञानेश्वर बुधवत**

अंतर्राष्ट्रीय ख्याती प्राप्त कवी साहित्यिक तथा निरामय सामाजिक कार्यास्तव साऊथवेस्टर्न अमेरिकन विद्यापीठातर्फे मानद डॉक्टरेट प्राप्त अर्धशतकीय अनुभवी विधिज्ञ डॉ. विजयकुमार कस्तुरे, चिखली तसेच साहित्य प्रांतातील सक्षम कथाकथनासाठी सुप्रसिद्ध असलेले व त्या प्रित्यर्थ अमेरिकन विद्यापीठाची डॉक्टर ऑफ लिटरेचर ही मानद पदवी मिळालेले डॉ. बबनराव महामुने, औरंगाबाद व भावकवी म्हणून महाराष्ट्र, गुजरात, गोवा इ. प्रांतांमधून संमेलने गाजविणारे सामाजिक कार्यकर्ते आयुष्मान अंकुश पडघान, बोरगाव काकडे यांनी, बुलढाणा जिल्ह्यातील नामांकित वकील



मा. विजय इंगळे, बुलढाणा हे नुकताच आपला जर्मनी देशाचा जवळपास तीन महिन्यांचा कौटुंबिक दौरा सपत्नीक यशस्वीपणे आटोपून आल्या निमित्ताने, त्यांच्या निवासस्थानी त्यांची भेट घेऊन, पुष्पगुच्छ प्रदान करून त्यांचा भावपूर्ण कौटुंबिक सत्कार व स्वागत सर्व विधिज्ञ मित्र तथा नागरिकांच्या वतीने वरील मान्यवरांनी केला तेव्हा अतिशय गदगदीत अंत:करणाने डव्होकेट व्ही. एन. इंगळे यांनी वरील प्रमाणे उदगार काढून आपल्या लोकांच्या या आत्यंतिक प्रेम व जिव्हाळ्यासंदर्भात आपली हार्दिक कृतज्ञता व्यक्त करून हे गौरवशाली क्षण कायम स्मरणात राहतील असेही आपले बंधू डव्होकेट विलास इंगळे, डव्होकेट राजू इंगळे तसेच कुटुंबासमक्ष स्पष्ट बोलून मित्रांचे आभार मानले.

---

# श्री जगद्गुरु संत तुकाराम महाराज मंदिर वसंत नगर आष्टी जिल्हा बीड सेवा समितीच्या वतीने

## आदिशक्ती श्री रुक्मिणी देवी शारदीय नवरात्रोत्सवा निमित्त भव्य राज्यस्तरीय काव्य संमेलन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । अण्णासाहेब साबळे**

श्री जगद्गुरु संत तुकाराम महाराज मंदिर आष्टी,जिल्हा बीड सेवा समितीच्या वतीने आदिशक्ती श्री रुक्मिणी देवी शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त भव्य राज्यस्तरीय काव्य संमेलन शुक्रवार दिनांक ११.१०.२०२४ या दिवशी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत आयोजित केले आहे सदर कार्यक्रमासाठी सदर कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्यतील नगर,बीड, सोलापूर,रत्नागिरी अशा विविध जिल्ह्यातून कवी येणार आहेत तरी रसिक स्रोत्यांनी उपस्थित राहून या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा



प्रमुख पाहुणे म्हणून ह.भ.प.आदिनाथ महाराज दानवे स्वागताध्यक्ष घनश्याम महाराज खलाशे तर कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ कवी महादेव लांडगे यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडेल. यावेळी निमंत्रित कवी --

संजय शेळके,मुकुंद लगड,सौ लक्ष्मी लांडगे,बाळासाहेब घोरपडे,बाबासाहेब शिकारे, विश्वेश्वर बोडखे,जान्हवी मंडलिक,रंगनाथ राळेभात,गोकुळ गायकवाड,एकनाथ पवार, बाबासाहेब राजगुरू,प्रकाश खंडागळे यांच्यासह पुरोगामी पत्रकार संघाचे अध्यक्ष अण्णासाहेब साबळे उपस्थित राहणार आहेत.यावेळी उपस्थित कवींचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात येणार आहे तरी रसिक श्रोत्यांनी उपस्थित राहून या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा.स्थळ:श्री जगद्गुरु संत तुकाराम महाराज मंदिर वसंत नगर( मुर्शदपूर )आष्टी जिल्हा बीड

---

# बौद्ध धम्मानेच बहुजन समाजाचे ऐक्य होवून सत्ताधारी बनू शकतात-प्रबुद्ध साठे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । अण्णासाहेब साबळे**

आरक्षणा संदर्भात न्यायपालिकेचे निर्णय व मत नेहमीच संशयास्पद,नकारात्मक व विरोधात राहीले असून आरक्षणाची अंमलबजावणी करण्यासाठी सुप्रीम कोर्टाने सरकारला कधीही निर्देश दिले नाहीत,उलट आता एसी एसटी आरक्षणात उप वर्गीकरणास मान्यता देवन व याचीका,विषय नसताना क्रिमीलेयर,एकदाच आरक्षण मिळावे अशा प्रकारचा संविधान विरोधी निर्णय,मत व सल्ला देवून सुप्रीम कोर्टाने एसी एसटी वरती अन्यायच केला आहे,त्यामुळे आता आरक्षणाचे लाभार्थी असलेल्या एसी एसटी ओबीसी अन्य बहुजन बांधवांनी सत्ताधारी बनून आपल्या हक्काची अंमलबजावणी करावी असे प्रतिपादन चला आपल्या बुध्दाच्या घरी अभियान प्रमुख व भारतीय बौद्ध धम्म संस्कार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष प्रबुद्ध साठे यांनी केले ते मुंबई








दादर येथील मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय येथे आयोजित उप वर्गीकरणामागील मनसुबे व अनुसूचित जातीवर परिणाम या परिसंवाद मध्ये प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते, आंबेडकरवादी भारत मिशन आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर इन्स्टिट्यूट ऑफ सोशल अण्ड इकॉनॉमिक चेंज आयोजित रिपब्लिकन पक्ष स्थापन दिनाच्या निमित्ताने आयोजित या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ भालचंद्र मुणगेकर हे होते तर प्रमुख मार्गदर्शक संविधान तज्ञ व बी आर एस पी चे संस्थापक अध्यक्ष डॉ सुरेश माने साहेब,हे होते, इतर वक्ते म्हणून प्रा जी के डोंगरगावकर,पत्रकार मधू कांबळे होते,प्रबुद्ध साठे पुढे म्हणाले की,कांग्रेस व भाजप हे दोन्हीही संविधानानुसार लोकशाही चालवण्यात नालायक आहे,यासाठी आता संविधान व लोकशाही भारत वाचवण्यासाठी आंबेडकरवादी स्वतंत्र व स्वाभिमानी राजकारणाचा प्रभाव वाढवणे गरजेचे आहे,यासाठी बौद्ध धम्मानेच बहुजन समाजाचे ऐक्य होवून आंबेडकरवादी शासन या देशात येवू शकते असा आशावाद ही प्रबुद्ध साठे यांनी व्यक्त केला,डॉ सुरेश माने साहेब यांचेही अत्यंत मोलाचे व अभ्यासपूर्ण मार्गदर्शन झाले,कार्यक्रमाचे निमंत्रक सुरेश केदारे,दिवाकर शेजवळ,सतीश डोंगरे,ड जयमंगल धनराज प्रशांत रूपवते,दिपक चौघुले, पंकज चाळके,या प्रसंगी बहुसंख्य समाज बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# कंधारचे ग्रामदैवत अष्टभुजा खडंकी माता मंदिर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

कंधारचे ग्रामदैवत म्हणून सर्व परिचित असलेले अष्टभुजा खडंकी देवीचे मंदिर या देवीच्या हातात खडग (तलवार )आहे, म्हणून या मंदिराचे नाव अष्टभुजा खडंकी माता मंदिर असे पडले,देवीची मूर्ती ही गारगोटीच्या दगडातील असून महिषासुराचा वध करत असलेल्या दुर्गाभवानी रूपामध्ये,देवीस ८ हात असून सर्व हातामध्ये आयुधे आहेत, महिषासुर हा मनुष्य आणि पशु या दोन रूपात आहे तर त्याचे शरीर रेड्याचे असून त्याचे शीश हे राक्षसाचे आहे तर देवीचे वाहन सिंह असून आक्रमक दिसून येतो,

या मंदिराचे बांधकाम कळ्या पाषाणात केलेले असून उंच अशा वट्ट्यावर बांधले आहे,मंदिरात गर्भगृह, ओहरी व सभामंडप हे ३ भाग आहेत, मंदिरात जाण्यासाठी दगडी कोरीव पायऱ्या आहेत,तर मंदिर जमिनीपासून १० फूट उंचीवर आहे.या मंदिराच्या सुरक्षा भिंती व किल्ल्याच्या संरक्षण भिंती मध्ये साम्य दिसून येते,

या मंदिराचे शिखर आधुनिक पद्धतीने बांधले असले तरी हे शिखर श्री लक्ष्मी यंत्राच्या आकारात असून हे शिखर कासवाच्या पाठीवर उभारल्या गेलेले आहे,हे विशेष.आणि दररोज सूर्यकिरणे हे देवीच्या गर्भग्रहापर्यंत व देवीच्या मूर्तीवर पडतात हे मात्र सर्व भाविकात कुतुहल निर्माण करणारे आहे हे मंदिर स्थापत्यशास्त्राचे अलौकिक उदाहरण आहे,राजा कृष्णदेवराय तिसरा हा देवीचा उपासक व शिवभक्त होता, कृष्णदेवराय यांनी इसवी सनाच्या नवव्या शतकामध्ये कृष्णपुर (पंचाळपूर,कंधार) नगरीची स्थापना केली, त्यावेळी अनेक मंदिरे या कंधार परिसरात बांधले,

कंधार येथे भुईकोट किल्ल्याची बांधणी करण्या



अगोदर त्याने जगतुंग सागर च्या काठावर देवीची प्राणप्रतिष्ठा केली. त्याचबरोबर या जगतुंगसागराच्या बांधणीसाठी ,निर्मितीसाठी देवीच्या मंदिरा लगतच सिद्धिविनायक गणेशाची स्थापना करून तलावाचे काम पूर्ण केले,

अष्टभुजा खडंकी माता मंदिर हे पंचक्रोशीतील ग्रामस्थांचे ग्रामदैवत आहे नवरात्र मोहत्सवाच्या काळामध्ये महाराष्ट्र .कर्नाटक. तेलंगाना. आंध्रा येथील भाविक मोठ्या प्रमाणात येत असतात नवरात्राच्या काळामध्ये मंदिरामध्ये विविध धार्मिक कार्यक्रमासह सामाजिक उपक्रम मोठ्या प्रमाणामध्ये घेतले जातात विशेषतः अष्टमीच्या दिवशी होणारे कुमकुमअर्चन ही पूजाविधी साठी हजारो महिला या ठिकाणी उपस्थित राहुन सामूहिक पूजा केली जाते

या मंदिराचा जिर्णोद्धार सोळाव्या शतकामध्ये या किल्ल्याचा किल्लेदार गोपाळसिंह राजपूत याने केला असून या मंदिरामध्ये यात्रेकरूसाठी धर्मशाळा, वाट सुरू साठी पानपोई , घोड्यांसाठी पागा ही बांधला.आज हे मंदिर सुस्थितीत ठेवण्यासाठी गेल्या पन्नास वर्षापासून या मंदिराची विश्वस्त स्व.हरिसिंह ठाकूर यांनी शर्तीचे प्रयत्न केले. तर हीच परंपरा सध्या मंदिराची विश्वस्त उषाताई हरीसिंह ठाकूर हे पार पाडत आहेत.

> **“ जगतुंग सागराच्या काठावर असलेल्या मंदिरात होणारी सायंकाळची आरती ही मन प्रसन्न करणारी असते,आणि मंदिरातून दिसणारा अथांग जगतुंगसागर व नयनरम्य परिसर मन प्रसन्न करणारे आहे,या मंदिरात आल्यावर नवचैतन्य,ऊर्जा मिळते हा अलौकिक अनुभव भाविकांसाठी अनुभव करण्यासारखा आहे,**

# लोहा-कंधार मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी सदैव कटिबद्ध- चुकलवाड

## माजी सैनिक संघटनेच्या उमेदवारीमुळे अनेक पक्षांची वाढणार डोकेदुखी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

कंधार - लोहा तालुक्यात मागील तीन ते चार वर्षापासून मतदार संघात सर्वसामान्य प्रश्न सोडवून नावालौकिकास आलेली माजी सैनिक संघटना आगामी होणारी विधानसभा निवडणूक लढवणार असल्यामुळे मतदारसंघात अनेक पक्षांची डोकेदुखी वाढणार असे चित्र दिसत आहे.

गेल्या कंधार-लोहा तालुक्यांत तीन-चार वर्षापासून माजी सैनिक संघटना लोहा-कंधार मतदार संघामध्ये सैनिकांचे प्रश्न सोडवत आम जनतेचे पण प्रश्न सोडवण्याचा सातत्याने प्रयत्न करत आहे. कोरोनाच्या काळामध्ये संघटनेच्या वतीने पोलीस प्रशासनाच्या खांद्याला खांदा देऊन निस्वार्थपणे सहकार्य केले. त्यातूनच लोहा येथील उपजिल्हा रुग्णालयाला शहीद संभाजी कदम यांचे नाव देण्यासाठी समोर आले आणि तो मुद्दा आणखीन



प्रशासनाच्या दरबारी लावून धरलेला आहे. घरकुल, सिंचन विहिरी, जमिनी नावावर करणे, निराधार, संजय गांधी आशा अनेक योजनेच्या लाभार्थ्यांना मोबदला मोफत मिळवून देण्याचे काम माजी सैनिक संघटनेच्या वतीने चालत आलेले आहे,

कंधार तालुक्यांतील भ्रष्टाचार दलाली मुक्त करण्यासाठी संघटनेचा मोठा पुढाकार असून प्रशासनावर हमेशा लक्ष केंद्रित करून जनतेची लूट होणारं नाही असे कार्य करत असताना प्रशासनाकडून जनतेकडून सहकार्य मिळत असते पण कुठल्याही कार्यामध्ये संघटनेला लोक प्रतिनिधीकडून नेत्यांकडून हमेशा विरोधच होत आहे मग ते काम कुठलेही जनहिताचे असो किंवा सामाजिक असो पण येथील नेते लोकप्रतिनिधी आपल्या स्वार्थापोटी चांगल्या कामांमध्ये सुद्धा अडथळा निर्माण करत असतात माजी सैनिक संघटना ही काम करत असताना सुद्धा लोक प्रतिनिधीची प्रत्येक ठिकाणी अडवणूक होत असल्यामुळे सत्य असून सुद्धा असत्य ठरवण्यामध्ये लोकप्रतिनिधी यशस्वी ठरत आहेत. सत्ता तिथे शहाणपण असे काम या तालुक्यांमध्ये झालेले आहे आणि आज हा तालुका विकासापासून दूर जाऊन भ्रष्टाचाराचे घर बनलेले आहे.

> **तालुक्यात लाईट, पाणी, रस्ते,शिक्षण,आरोग्य या बाबीवर कुठलाच विकास झालेला नसून एवढंच नव्हे तर ज्यांनी आजी-माजी खासदार आमदारांनी अनेक वर्षे सत्ता भोगली त्यांच्याच गावांमध्ये जाण्यासाठी रस्ता करता आला नाही,यांना शिक्षण देता आलं नाही,यांना आरोग्य देता आलं नाही,हे कंधार तालुक्याचे दुर्दैव म्हणूनच आम्ही निर्धार केला आहे,की प्रस्थापित घराणेशाहीला मुक्त करून या तालुक्याचा विकास करून राज्यात लोहा-कंधार मतदारसंघाची आणखी वेगळी ओळख करण्याचा निराधार केला आहे म्हणून आम्ही माजी सैनिक संघटनेच्या वतीने जिल्हा अध्यक्ष बालाजी रामप्रसाद चुकलवाड याने निवडणूक लढवण्याचे निर्णय घेतला असल्याचे बोलताना सांगितले.**


# हमीभावाने सोयाबीन,मुग,उडीद विक्री करण्यासाठी शेतकऱ्यांनी ऑनलाईन नोंदणी करावी-सभापती रमजान तांबोळी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**

हंगाम २०२४-२५ मध्ये केंद्र शासनाच्या आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत माजीमंत्री सुरेश धस यांच्या विशेष प्रयत्नाने नाफेड च्यावतीने आष्टी तालुक्यातील सोयाबीन, मूग,उडीद उत्पादक शेतकऱ्यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती कडा येथे शासकीय खरेदी केंद्रावर आवश्यक त्या कागदपत्रांसह ऑनलाईन नोंदणी सुरू झाली असून शेतकऱ्यांनी ऑनलाईन नोंदणी करून घ्यावी असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी यांनी केले आहे .





कडा कृषी उत्पन्न बाजार समिती येथे माजी मंत्री सुरेश धस यांच्या विशेष प्रयत्नाने जामगाव सेवा सोसायटीला शासकीय हमीभाव खरेदी केंद्रांस मंजुरी मिळाली आहे.शेतकऱ्यांनी सातबारा,आधारकार्ड,बँक पासबुक,ऑनलाइन पिकपेरा प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रासह प्रत्यक्ष येऊन नोंदणी करण्याचे आवाहन केले आहे. सध्या खाजगी व्यापारी हमीभावापेक्षा कमी भावाने माल खरेदी करत असून शासकीय हमीभाव खरेदी केंद्रावर सोयाबीन ४८९२,मुग ८६८२,तर उडीद ७४०० रुपये प्रतिक्विंटल असा भाव मिळणार असून शेतकऱ्यांनी या संधीचा लाभ घेण्याचे आवहन सभापती रमजान तांबोळी यांनी केले आहे.मुग व उडीद खरेदीचा कालावधी ७ जानेवारी २०२५ तर सोयाबीन खरेदीचा कालावधी १२ जानेवारी २०२५ पर्यंत असणार आहे.



तीर्थक्षेत्र श्री पोहरादेवी येथील भेटीसाठी देशाचे लोकप्रिय पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांचे दि.५ ऑक्टोबर २०२४ शनिवार रोजी नांदेड येथील श्री गुरु गोबिंदसिंघजी विमानतळावर आगमन झाले असता माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी त्याचं स्वागत केलं.

# विद्यमानआमदाराला डॉ.गोपाल बछिरेचे आव्हान समोर या उत्तर द्या

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**

मेहकर येथे पार पडलेल्या परिवर्तन मोर्चात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछिरे यांनी विद्यमान आमदार यांच्या भ्रष्टाचाराचा पाढा वाचून समोर येऊन उत्तर देण्याचे आव्हान दिले स्वातंत्र्य मैदान मेहकर येथे पार पडलेल्या परिवर्तन मोर्चाचे जाहीर सभेत रूपांतर झाले व तेथे जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. नरेंद्र खेडेकर, जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत, जिल्हा उपप्रमुख प्रा. आशिष राहटे एड. सुमित सरदार व शिवसैनिक सिद्धार्थ खरात यांची भाषणे झाली परंतु महत्त्वाचे भाषण म्हणजे ज्या भाषणाने विद्यमान आमदार संजय रायमुलकर यांना आव्हानच देऊन टाकले त्यांनी केलेल्या भ्रष्टाचार, ठेकेदारीतील टक्केवारी व



भाड्याच्या घरात राहणारा हजारो कोटीचा मालक कसा झाला? व आमदाराच्या अमाप संपत्ती, जमीन जुमला मिळकतीचा पाढाच, शिवसेना जिल्हा संघटक डॉ.गोपाल बछीरे यांनी वाचला व प्रिंट मीडिया व इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या समोर मी येतो तुम्हीही या व सर्व प्रश्नांचे उत्तर द्या असे आव्हानच आमदारांना डॉ. बछीरे यांनी दिले



भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखाना युनिट नंबर ०२. डोंगरकडा बॉयलर अग्नी प्रतिपादन सोहळा संपन्न झाला .यावेळी माजी मुख्यमंत्री खा.अशोकराव चव्हाण साहेब यांच्या सोबत व्हि पि.के.उद्योग समुह कारखान्याचे चेअरमन लोकनेते मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांची प्रमुख उपस्थिती होती.

# उत्तम पवार यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

मागासवर्गीय शिक्षक संघटना महाराष्ट्र राज्य या संघटनेच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार श्री.उत्तम पवार सर यांना मिळाला आहे.

मोहोळ जि.सोलापूर येथे घाटुळे मंगलकार्यालया मध्ये हा कार्यक्रम संपन्न झाला .शामराव जवंजाळ ( राज्याध्यक्ष ),उमेश पाटील ( मुख्य प्रवक्ता रा.कॉ.),प्रदिप मोरे ( मा.शिक्षण संचालक सोलापुर),शशिकांत खुडे ( जिल्हाध्यक्ष सोलापूर)या मान्यवरांच्या हस्ते श्री.उत्तम पवार यांना पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला .यावेळी राज्यातील संघटनेचे २२ जिल्ह्यातील अध्यक्ष व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.उत्तम पवार यांचे शा.व्य.समितीचे अध्यक्ष व पदाधिकारी,सरपंच व उपसरपंच,सदस्य पाटोदा, केंद्रप्रमुख ,विस्ताराधिकारी, गटशिक्षणाधिकारी तसेच शिक्षक संघटनेचे पदाधिकारी व मित्र मंडळी अदिनी अभिनंदन केले आहे.



# लोकनेते पंकजाताई साहेब मुंडे यांच्या ऐतिहासिक दसरा मेळावास उपस्थित रहा-अॅड.सचिन श्रीमंत आंधळे यांनी केले आव्हान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । प्रतिनिधी**

शक्ती आणि भक्तीचा संगम असलेल्या भाजपाच्या नेत्या पंकजाताई मुंडे यांच्या भगवान भक्ती गडावरील ऐतिहासिक मेळाव्यास हजाराच्या संख्येने उपस्थित रहा असे आव्हान भाजपाचे युवा नेते अँड सचिन श्रीमंतराव आंधळे यांनी केले आहे ताईंचा दसरा मेळावा ऐतिहासिक होणार असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला महाराष्ट्रात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा नागपूर येथे शिवसेनेचा मुंबई शिवाजी पार्क येथे तर पंकजाताई गोपीनाथरावजी मुंडे यांचा पाटोदा तालुक्यातील सावरगाव घाट येथे ऐतिहासिक दसरा मेळावा होतो या तिन्ही दसऱ्या मेळावा कडे राज्याचे नव्हे तर देशाचे लक्ष लागलेले असते संत भगवान बाबा यांच्या जन्मभूमीत दसरा मेळाव्यात भाजपच्या नेत्या पंकजाताई मुंडे काय बोलतात याची उत्सुकता असते यावर्षी पंकजाताई मुंडे यांच्या दसरा मेळावा मागील गर्दीचे सर्व विक्रमी रेकॉर्ड मोडत ठरणार आहे या ऐतिहासिक दसरा मेळावा चे साक्षीदार होण्यासाठी प्रत्येकाने दसऱ्यामध्ये हजर राहावे असे आव्हान सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघातील भाजपाचे युवा नेते अँड सचिन श्रीमंतराव आंधळे यांनी केले आहे आणि हजारोच्या नव्हे तर लाखोच्या संख्येने आपण सावरगाव घाट येथे उपस्थित रहावे असे आवाहन केले आहे.




# शारीरिक शिक्षक श्री.राजुसिंग राठोड सर यांना आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देऊळगाव राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

दीनदयाल विद्यालय कनिष्ठ कला आणि विज्ञान महाविद्यालय दे.राजा जि. बुलढाणा येथे शारीरिक शिक्षक म्हणुन कार्यरत असलेले श्री. राजुसिंग राठोड यांना नैसर्गिक मानवाधिकार सुरक्षा परिषद फोरमच्या (गव्हर्न्मेंट ऑफ इंडिया) यांच्या वतीने दिला जाणारा डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे.



या पुरस्काराचे वितरण रविवार दि.०६ ऑक्टोबर २०२४ रोजी धुळे येथे सकाळी ठीक १०.००वा करण्यात येणार आहे. याप्रसंगी खासदार स्मिता वाघ, आत्माराम प्रधान,(पो. उपअधीक्षक नाशिक) परिषदेचे राष्ट्रीय सल्लागार गोपाल देवरे, सचिव जय बागूल, डॉ. ज्योती लष्करी, अध्यक्ष प्रफुल्ल पाटील, मंदाकिनी भाकरे, ईश्वरी पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. सदर परिषदेस चार केंद्रीय मंत्रालयाची मान्यता आहे.

शारीरिक शिक्षक श्री. राजुसिंग राठोड सर यांनी अथक परिश्रम घेऊन अनेक विद्यार्थी घडवले आहेत.त्यांचे विद्यार्थी जिल्हा,विभाग तसेच राज्यस्तरावर झळकले आहेत. विशेष म्हणजे श्री. राठोड सर हे स्वतः उत्तम कबड्डी खेळाडू आणि क्रिडा प्रशिक्षक आहेत सतत क्रिडा, शिक्षण,पर्यावरण आणि सांस्कृतिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या श्री राठोड सर यांना परिषदेच्या वतीने हा पुरस्कार जाहीर झाल्याने त्यांचे विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच सामान्य जनतेकडून अभिनंदन केले जात आहे.

# आरक्षणाच्या रक्षणासाठी आदिवासी समाजाचा उमरखेड येथे मोर्चा

## यवतमाळ जिल्ह्यातील सर्वात मोठा मोर्चा;माहेश्वरी चौकात केले रास्ता रोको आंदोलन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड । सय्यद रहीम राजा**

तालुक्यातील सकल आदिवासी समाजाच्या वतीने,आदिवासी समाजात धनगर समाजाची होणारी घुसखोरी थांबविण्यासह,विविध मागण्यासाठी उमरखेड शहरात मोठा मोर्चा काढून सरकारचा निषेध व्यक्त करून माहेश्वरी चौकात रोको आंदोलन सुद्धा केले. सध्या महाराष्ट्रात सुरु असलेल्या धनगर आदिवासी समाजाच्या आरक्षणाबाबत सुरु असलेला वाद सोडवण्यासाठी,मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी धनगर समाजाच्या पंढरपूर येथे सुरु असलेल्या उपोषणाला भेट दिली असता,धनगर समाजाला आदिवासींचे आरक्षण देण्यासंदर्भात आश्वासित केले,यामुळे आदिवासींच्या भावना दुखावल्या गेल्याने,धनगर आदिवासी आरक्षण वाद पेटला. दरम्यान उमरखेड तालुक्यातील सकल आदिवासी समाजाच्या वतीने शुक्रवार दि.४ऑक्टोबर रोजी १ वाजता उपविभागीय अधिकारी उमरखेड यांच्या कार्यालयावर मोर्चा काढून विविध मागण्याचे निवेदन आदिवासी समाजाने





उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत राष्ट्रपती यांना दिले,त्या अगोदर कृषी उत्पन्न बाजार समिती मधून निघालेल्या मोर्चात आदिवासी समाजातील हजारोंच्या संख्येने महिला,पुरुष तरुण सहभागी झाले होते, बिरसा मुंडा की जय,डॉ,बाबासाहेब आंबेडकर की जय, जय बिरसा जय आदिवासी अशा घोषणेने उमरखेड शहर दणाणून गेले होते,बाजार समितीच्या मैदानातुन निघालेला मोर्चा माहेश्वरी चौकात जाऊन तेथे रास्ता रोको करण्यात आले,मोर्चा मधील आदिवासी समाजाने रास्ता रोको केल्या मुळे महामार्गाच्या दुतर्फा वाहणांच्या रांगा लागल्या होत्या.

दरम्यान,महाराष्ट्रातील धनगर जात असून आदिवासी ही जमात असल्याने,धनगर समाज आदिवासीचे कोणतेही निकष पूर्ण करू शकत नाही,तरी महाराष्ट्रातील आदिवासी आरक्षणाच्या सुचितील ३६ नंबरची जमात ओरान धनगड असून,धनगर नाही तरि धनगर समाज धादांत खोटा बोलत असून,सरकारच्या डोळ्यात धूळ फेकत आहे.तरी धनगर जात ही आदिवासी नसून,आदिवासींचे आरक्षण व सवलत धनगरांना देऊ नये,धनगर समाजाच्या अभ्यासासाठी नेमण्यात आलेल्या टाटा या समाजशास्त्र संस्थेचा अहवाल जाहीर करावा,अधिसंख्य पदांमुळे रिक्त झालेल्या आदिवासींच्या १२५०० जागा तात्काळ भराव्या व आदिवासी पेसा १७ संवर्गातील भरती प्रक्रिया तातडीने राबवावी अशा अनेक मागण्या आदीवासी समाजाच्या वतीने करण्यात आल्या,यावेळी साहित्यिक प्रा. माधवराव सरकुंडे, आदिवासी पँथर संघटनेचे राज्याध्यक्ष प्रशांत बोडखे, आदिवासी कृती समिती सर्व पदाधिकारी सर्व सामाजिक संघटना तथा आदिवासी बांधव शेकडोच्या संख्येने उपस्थित होते.कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस निरीक्षक कैलास भगत यांनी पोलिसांचा तगडा बंदोबस्त ठेवला होता.

# गगनबावडा महाविद्यालयात आज आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

पद्मश्री डॉ.ग.गो.जाधव महाविद्यालय, गगनबावडा येथे आज शनिवार दिनांक ०५ ऑक्टोबर २०२४ रोजी एक दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. विज्ञान, व्यवसाय आणि मानव्यशास्त्र या विद्याशाखांमध्ये समन्वय साधण्यासाठी सहयोगी नवकल्पना (खउइत्रछख-२०२४) या मुख्य विषयावर शोधनिबंध सादरीकरण व आंतरराष्ट्रीय चर्चा सत्रामध्ये विविध विषयांवर विचार मंथन होणार आहे. परिषदेचे उद्घाटक डॉ. दिलीप जवळकर हे असणार आहेत. या वेळी प्रा.सुबोध शर्मा (पर्यावरणशास्त्र आणि अभियांत्रिकी विभाग, काठमांडू विद्यापीठ, नेपाळ) यांचे बीज भाषण आणि डॉ. सागर डेळेकर ( समन्वयक, नॅक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) यांचे प्रमुख मार्गदर्शन होणार आहे. दुपारच्या सत्रात देशाच्या विविध भागातून सहभागी झालेल्या संशोधक विद्यार्थी आणि प्राध्यापकांचे शोध निबंध सादरीकरण होईल. या सत्रात विज्ञान विभागात डॉ.एल.पी.लंका (प्राणीशास्त्र विभाग, देवचंद कॉलेज, अर्जुननगर) आणि डॉ.एस.ए.व्हनाळकर (कर्मवीर हिरे कॉलेज, गारगोटी), व्यवसाय व वाणिज्य विभागात डॉ.के.व्ही.मारुलकर (वाणिज्य आणि व्यवस्थापन विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) आणि डॉ.एम.ए.कोळी (वाणिज्य विभाग प्रमुख, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड) तर मानव्यशास्त्र विभागात डॉ.एन.आर.पाटील (गव्हर्नमेंट फर्स्ट ग्रेड कॉलेज फॉर वूमन, बेळगावी) व डॉ.रविंद्र भनगे (माजी विभागप्रमुख, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) हे अनुक्रमे साधन व्यक्ती आणि अध्यक्ष असणार आहेत. समारोपीय सत्रात डॉ.टी.एम.चौगुले (संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.सतिश देसाई (संस्थापक अध्यक्ष, आनंदी शिक्षण प्रसारक मंडळ कळंबे तर्फ कळे) यांचे मार्गदर्शन आणि सन्मानपत्र वितरण सोहळा संपन्न होणार आहे. या आंतरराष्ट्रीय परिषदेला संशोधकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे. अशी माहिती प्राचार्य डॉ.टी.एम.पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली. या वेळी संस्था अध्यक्ष प्रा.सतिश देसाई, संस्था सचिव प्रा.डॉ.विद्या देसाई, उपप्राचार्य प्रा.डॉ.एस.एस.पानारी, निमंत्रक डॉ.संतोष भोसले व प्रा.राहुल कांबळे, समन्वयक प्रा.ए.एस.कांबळे व प्रा.ए.आर.गावकर आणि खजिनदार प्रा.एस.एस.घाटगे उपस्थित होते.

# आय.टी.आय.च्या माध्यमातून टेक्निकल शिक्षण देऊन युवकांच्या हाताला काम देण्यासाठी प्रयत्न करणार-माजी आ.भीमराव धोंडे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

दिवसेंदिवस दिवस पदवी - पदव्युत्तर शिक्षण घेऊन बेकारी वाढतच आहे.आय.टी.आय.संस्था सुरू करुन बेरोजगारीवर मात करण्यासाठी जून महिन्यापासून मतदारसंघात ५ ठिकाणी आय.टी.आय.सुरू करणार असल्याचे माजी आ.भीमराव धोंडे गाव भेट दौऱ्याच्या निमित्ताने ठिकठिकाणी झालेल्या सभेत सांगितले.

पुढच्या महिन्यात होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने माजी आ.भीमराव धोंडे यांनी गेल्या दोन महिन्यापासून सुरू केलेल्या जनसंपर्क अभियानांतर्गत गावभेट दौऱ्याच्या निमित्ताने लोकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी दौरा सुरू आहे. ४ ऑक्टोबर रोजी आष्टी तालुक्यातील बावी,सुरुडी, नागतळा,खडकवाडी,पांगरा, महिंदा,मोराळा, मेरडवाडी,माळेवाडी,वनवेवाडी पाटसरा,हातोला,कापशी या गावांचा दौरा केला.ठिकठिकाणी तोफा व फटाके वाजवून माजी आमदार भीमराव धोंडे यांचे ग्रामस्थांनी स्वागत केले. नागतळा येथील ग्रामस्थांनी बैलगाडीतून वाजतगाजत मिरवणूक काढून स्वागत केले.





पुढे बोलताना माजी आमदार भीमराव धोंडे यांनी सांगितले आपल्या संस्थेत सध्या वेगवेगळ्या अभ्यासक्रमासाठी गोरगरिबांची ४० हजारांवर विद्यार्थी शिकत आहेत.बारावी व नंतर पदवीचे शिक्षण घेऊन सध्या नोकऱ्या कमी आहेत, त्यामुळे भविष्यात टेक्निकल शिक्षण महत्त्वाचे आहे.दहावी पास नंतर इतर शिकण्यापेक्षा एक - दोन वर्षांचे आय.टी. आय.कोर्स पुर्ण केल्यास विविध कंपन्यामध्ये नोकरी मिळते त्यामुळे काही प्रमाणात का होईना बेरोजगारीवर मात करता येईल.वेगवेगळ्या प्रकारचे शंभरावर कोर्सेस आहेत असेही मा.आ.भिमराव धोंडे यांनी सांगितले.

हातोला येथे लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्या पुतळ्यास माजी आ.भीमराव धोंडे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस

अजयदादा धोंडे यांनी सांगितले की,साहेब हे उमेदवार निश्चित आहेत,त्यामुळे आपण सर्वांनी लोकसभेच्या निकालाचा वचपा काढण्यासाठी तयारी करा. साहेबांनी मतदारसंघाचा चांगला विकास केला आहे.हक्काचा माणूस म्हणून साहेबांना विधानसभेत पाठवा.वेगवेगळ्या ठिकाणी भाऊसाहेब लटपटे,माजी पं.स.सदस्य बाबासाहेब गर्जे,कुंडलिक आस्वर,सरपंच अभय गर्जे, सरपंच बाळासाहेब गर्जे,सरपंच संजय मिसाळ,सरपंच डॉ. नवनाथ गर्जे,कुंडलिक लटपटे, सुर्यभान कावळे,माजी सरपंच नारायण गर्जे,नवनाथ मिसाळ, सरपंच महेश अंगारखे,रामदास सोनवणे,भगवान गर्जे,विठ्ठल रोमण,कचरु दराडे,राजाभाऊ दगडखैर व इतरांची भाषणे झाली.श्री.छगनराव तरटे,अभयराजे धोंडे,भाजपाचे जिल्हा सरचिटणीस शंकरराव देशमुख,युवा नेते विकी शेकडे, कुंडलिक आस्वर,योगिराज गर्जे, आबासाहेब गोल्हार,निवृत्ती गर्जे,रामभाऊ सारुक, उपसरपंच एकनाथ गर्जे,साहेबराव गर्जे,सरपंच केशव गर्जे,गहिनीनाथ साबळे, बबनराव सोनवणे,माऊली गर्जे , राजेंद्र गोरे,मच्छिंद्र गर्जे, दादासाहेब गर्जे,बाबासाहेब गर्जे,भगवान गर्जे,पोपट दहिफळे,मुरलीधर दहिफळे, आजिनाथ दहिफळे,बापुराव आव्हाड,सुर्यकांत गर्जे,मुरलीधर शेंडे,राजु जाधव,विष्णू शेंडे,अमोल शेंडे,सरपंच रभाजी गर्जे,सुखदेव शेंडे,अंबादास गर्जे,बापुराव गर्जे,आजिनाथ गर्जे,बाबासाहेब फुलमाळी व इतर उपस्थित होते.

# महाराष्ट्रातील जैन समाजासाठी स्वतंत्र विकास महामंडळाची स्थापना

## श्री.राजेश क्षीरसागर आणि श्री.ललित गांधी यांचा यशस्वी पाठपुरावा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**

जैन समाजाच्या संपूर्ण भारतातील एकूण संख्येपैकी सर्वाधिक म्हणजे ६० लाख इतक्या संख्येने जैन समाज महाराष्ट्रामध्ये राहात असुन, जैन समाजाची देशातील सर्वाधिक लोकसंख्या असलेले राज्य 'महाराष्ट्र राज्य' आहे. महाराष्ट्रासह देशात सर्वाधिक सामाजिक संस्था चालविण्याची ख्याति असलेला जैन समाज व्यापार-उद्योगामध्येही अग्रेसर असुन सर्वाधिक कर देणारा समाज आहे. मात्र याच समाजात शेतीमध्ये काम करणाऱ्यांची संख्याही लक्षणीय असुन निम्न मध्यमवर्ग व दारीद्रय रेषेखालील लोकांची संख्या ३० टक्के इतकी आहे. समाजातील या घटकांच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकासासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करावे अशी गेली अनेक वर्षांची मागणी होती. याबाबत अखिल भारतीय जैन अल्पसंख्याक महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष ललित गांधी यांनी राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर यांच्याकडे निवेदन सादर केले होते. राजेश क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी संपर्क साधून जैन समाजासाठी स्वतंत्र विकास महामंडळ स्थापन करण्याची विनंती केली. आज झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत महाराष्ट्रातील जैन समाजासाठी स्वतंत्र विकास महामंडळाची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर यांनी दिली.

महाराष्ट्रातील जैन समाजासाठी स्वतंत्र विकास महामंडळाची स्थापना करण्याबाबत राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष श्री.राजेश क्षीरसागर आणि अखिल भारतीय जैन अल्पसंख्याक महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या पाठपुराव्यास यश मिळाले.

याबाबत प्रतिक्रिया देताना श्री.राजेश क्षीरसागर यांनी, हजारो वर्षांचा इतिहास असलेल्या जैन धर्मातील महाराष्ट्रातील विविध तीर्थक्षेत्रे व धार्मिक क्षेत्रांचा विकास व संरक्षण, जैन साधु-साध्वी यांची सुरक्षा, जैन धर्म- संस्कृति-साहीत्य यांचे संवर्धन व सुरक्षा, जैन युवकांना उद्यमशीलतेसाठी आर्थिक सहाय्य, जैन विधवा महिलांच्या सक्षमीकरणासाठी उपक्रम या प्रमुख उद्दीष्टांच्या पुर्ततेसाठी जैन समाजासाठी स्वतंत्र विकास महामंडळ स्थापन्याची आवश्यकता होती. जैन समाजाच्या सभेमध्ये जैन समाजासाठी स्वतंत्र विकास महामंडळ स्थापन करण्यात येईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केले होते. याबाबत सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत महाराष्ट्रातील जैन समाजासाठी स्वतंत्र विकास महामंडळ स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. आगामी काळात महाराष्ट्र राज्यातील जैन समाजाच्या उन्नतीचे द्वार खुले झाले असून, निश्चितच याचा लाभ जैन समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी होणार आहे.दिलेला शब्द पाळणारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदेच पुन्हा एकदा सिद्ध

# नायगाव तालुक्यातील रस्त्यांची गुणवता टक्केवारीत बोगस कामे करणाऱ्या गुतेदारांना अधिकाऱ्यांचे पाठबळ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । प्रतिनिधी**

अधिकारी आणि गुतेदाराच्या संगणमताने नायगाव सार्वजनिक बांधकाम उपविभागात रस्त्यांची कामे बोगस व निकृष्ट दर्जाचे करण्यात येत आहेत. कोट्यवधी रुपये खर्चाच्या रस्ता कामाच्या अंदाजपत्रकात अनेक महत्त्वाच्या तरतुदी ठेवण्यात आल्या मात्र एकही गुत्तेदार अंदाजपत्रकातील तरतुदीनुसार काम करत नाही. टक्केवारीच्या ओझ्याखाली दबलेले अधिकारी तोंडावर बोट व कानावर हात ठेवून बसले आहेत याचा फटका नागरिकांना बसत असल्याने या कामांची गुणनियंत्रण पथकामार्फत चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

सध्या नायगाव सार्वजनिक बांधकाम उपविभागात एकाच नेत्याची दादागिरी सुरु असून अधिकारी या नेत्याच्या दावणीला बांधले असल्यासारखे वावरत आहेत. रस्ते कामाचे अंदापत्रक तयार करतांना अनेक मोठ्या तरतुदी ठेवण्यात येत आहे पण काम करतांना अंदाजपत्रकातील मानकानुसार कामे करण्यात येत नाहीत. कुणी तक्रार केली तरच त्या कामावर अधिकारी जातात आणि चौकशी करण्याचा फार्स करतात. मागच्या चार वर्षात नायगाव तालुक्यात १०० किलोमीटर रस्ते झाले असतील यासाठी जवळपास २०० कोटीचा खर्चही झाला आहे पण यातील



एकाही रस्त्याची गुणवत्ता अंदाजपत्रकातील मानकानुसार नाही. विशेषतः नायगाव उपविभागात वार्षिक दुरुस्ती करणे आणि नळकांडी पुलाची कामे दरवर्षी केल्या जातात. या कामातून केवळ अधिकारी आणि गुत्तेदारांना पोसण्याचे काम होत आहे.

दरवर्षी वार्षिक दुरुस्तीसाठी कोट्यवधी रुपयाची कामे हाती घेतली जातात पण ती कामे कुठे होतात हे कुणालाच कळत नाहीत. दुसरीकडे याच रस्त्यावर सुधारणेचे काम करण्यात येते. नायगाव तालुक्यातील घुंगराळा ते बळेगाव रस्ता १० कि.मी. खर्च १३ कोटी, शेळगाव छत्री-सुजलेगाव-औराळा-कोठाळा १० कि.मी. खर्च १५ कोटी, नायगाव बेंद्री मंजरम ५ कि.मी. खर्च ६ कोटी, कुंटूर फाटा ते कुंटूर ८ कि.मी. खर्च ८ कोटी, कहाळा फाटा ते पाटोदा बरबडा अंतरगाव १२.५ कि.मी खर्च १६ कोटी आणि हुस्सा ते राहेर ६ कि.मी. खर्च ७.८० कोटी असा जवळपास वरील सर्व कामासाठी जवळपास ६६ कोटींचा खर्च झालेला आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात खर्च होवूनही या सर्व रस्त्यांची केवळ सहा महिण्यातच बकाल अवस्था झाली आहे. झालेल्या कामाकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी दुर्लक्ष केल्याने संबधीत गुतेदार अतिशय सुमार दर्जाचे व बोगस कामे केली आहेत.

या सर्व बोगस व सुमार दर्जाच्या कामाला नायगाव सार्वजनिक बांधकाम उपविभागाचे उपभियंता बारसकर व देगलूरचे कार्यकारी अभियंता कोटलवार हे पाठबळ देत असल्याचा आरोप करुन वरील कामाची चौकशी गुणनियंत्रण पथकाकडून करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अंकुशकुमार देगावकर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागच्या मुख्य अभियंत्यासह गुणनियंत्रण विभागाचे अधिक्षक अभियंता व नांदेड विभागाचे मंडळ अधिक्षकाकडे तक्रार केली आहे.दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपभियंता गणेश बारसकर यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904